# भुलभुलावण ***

(१०)

संख्या २००९
पान १९

सखे पुरे झाली आतां
तुझी भूल भुलावण
माझ्या सावलीला घाल
तुझा देह पांघरुन

बघ माझ्या लोचनांत
कसा दाटला प्रकाश
विखरल्या बुबुळांना
दान मिळाले आकाश

लक्ष लक्ष तारकांची
(श्ये) तिथे चाहुलते हांक
आठवांची पानझड
तुझी माझी आणभाक

सखे संथ पाण्यावर
जरी स्थिरावते नाव
तरी किनाऱ्यावाचून
नाही भेटणार गांव

वैशाखाला विसरून
चल पेरव श्रावण (उरी साठव श्रावण)
सखे पुरे झाली आता
तुझी भूलभुलावण.

~~१५/४/६८~~

सहदेव मरवळकर